K.T.S.P.Mandal's

Hutatma Rajguru Mahavidyalaya, Rajgurunagar.

Department of Economics

HOD – Dr.R.S.Shirasi

Class:- S.Y.B.A(DSE-1A)SEM III

Subject:- MICRO ECONOMICS

सूक्ष्म अर्थशास्त्र (S 1)

Sub Teacher – S.V.Dhanapune

घटक : Unit No. 3 मागणी सिद्धांत

उपघटक :- मागणीची संकल्पना,मागणी अर्थ व व्याख्या मागणीचा नियम, मागणीच्या लवचिकतेचे प्रकार,पुरवठा: संकल्पना नियम निर्धारक घटक

HRM Micro Economics Spe.1

UNIT No. 3

मागणी सिद्धांत

Theory of Demand



UNIT No. 3

मागणी सिद्धांत

Theory of Demand

प्रास्ताविक

प्रत्येक उपभोक्ता गरजा तृप्त करून जास्तीत जास्त समाधान मिळविण्याचा प्रयत्न करीत असतो गरजेच्या पूर्ततेसाठी उपयुक्त असलेली वस्तू प्राप्त करणे खात्याच्या प्रयत्नाचा उद्देश असतो बाजारात उपयुक्त असलेली वस्तू प्राप्त करण्याकरता संबंधित वस्तूची मागणी करणे आवश्यक असते प्रत्येक मनुष्याला अनेक इच्छा असतात त्यांची तीव्रता जास्त असते अशा गरजा असे म्हटले जाते सर्वसाधारणपणे व्यवहारात इच्छा आणि मागणी हे दोन्ही शब्द एकाच अर्थाने वापरले जातात परंतु अर्थशास्त्रामध्ये मात्र इच्छा आणि मागणी या दोन्ही संकल्पनांमध्ये फरक केला जातो म्हणून अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून केवळ इच्छा मागणी ठरू शकत नाही ते पुढील व्याख्येवरून अधिक स्पष्ट होईल.

3.1 मागणीची संकल्पना

मागणी अर्थ व व्याख्या

"आर्थिक शक्तीचे पाठबळ लाभलेली इच्छा म्हणजे मागणी होय."

"विशिष्ट वेळी विशिष्ट किमतीला विशिष्ट वस्तूची खरेदी केली जाणारी नगसंख्या म्हणजे त्या वस्तूची मागणी होय."

उदा.एखाद्या गरीब व्यक्तीने मोटारगाडी घेण्याची इच्छा व्यक्त केली तर ती मागणी होऊ शकत नाही कारण त्याची आर्थिक कुवत क्षमता किंवा खरेदी शक्ती तेवढी नसल्याने ती

HRM Micro Economics Spe.1

फक्त इच्छा असते परंतु एखाद्या श्रीमंत व्यक्तीची आर्थिक कुवत असून देखील वस्तू खरेदी करण्याची त्याची इच्छा नसेल तर ती मागणी होऊ शकत नाही म्हणजेच मागणी निर्माण होण्यासाठी इच्छा व आर्थिक कुवत किंवा खरेदी शक्ती या दोन्ही गोष्टी एकत्र येणे आवश्यक आहे कोणत्या वस्तूंची मागणी निर्माण होण्याकरता त्यात पुढील तीन तत्त्वाचे अस्तित्व असणे आवश्यक आहे.

1 मागणी करणाऱ्या व्यक्तीच्या मनात वस्तू प्राप्तीची इच्छा असली पाहिजे.

2 फक्त इच्छा असून चालणार नाही तर तिला पैशाचे पाठबळ असले पाहिजे.

3 जवळ असलेला पैसा वस्तू प्राप्तीकरिता खर्च करण्याची संबंधित व्यक्तीची तयारी असली पाहिजे.

अर्थात खरेदी शक्तीचे पाठबळ असूनही इच्छा मागणीत रूपांतरित होईलच असे नाही त्यासाठी वस्तूची किंमत व विशिष्ट वेळ या दोन बाबींचा विचार होणे आवश्यक आहे एखादा उपभोक्ता ज्या किमतीला वस्तू विकत घ्यायला तयार आहे ती उद्या त्याच किमतीला विकत घेईल असे सांगता येत नाही म्हणूनच विशिष्ट वेळी विशिष्ट किमतीला वस्तूचे जितके न खरेदी केली जातात ती त्या वस्तूची मागणी होय अशी मागणी ची व्याख्या करता येईल या व्याख्येवरून एका उपभोक्त्याचे मागणी स्पष्ट होते त्या बरोबरच व्यवसाय संस्थेची तिच्या वस्तूला असणारी मागणी स्पष्ट होते.

3.2 मागणीचे निर्धारक घटक

HRM Micro Economics Spe.1



मागणी पुढील घटकावर अवलंबून असते.........

1. वस्तूची किंमत

वस्तूच्या किमती वर मागणी अवलंबून असते किमती वाढल्या तर मागणी कमी होते या उलट किंमत कमी झाली तर वस्तूची मागणी वाढते म्हणजेच वस्तूची किंमत मागणी ठरविणारा महत्त्वाचा घटक आहे.

2. उपभोक्त्याचे उत्पन्न

मागणी उपभोक्त्याच्या उत्पन्नावर अवलंबून असते वस्तूच्या किमती त्याचा असताना जर उपभोक्त्याच्या उत्पन्नात वाढ होत असेल तर मागणी वाढत असते अपवाद म्हणजे निकृष्ट दर्जाच्या वस्तू उत्पन्नात वाढ होऊ नये निकृष्ट दर्जाच्या वस्तूचे मागणी वाढत नाही तर कमी होते.

3. उत्पन्नाचे वाटप किंवा संपत्तीचे वितरण

HRM Micro Economics

समाजात उत्पन्नाचे वाटत कशाप्रकारे झाले आहेत यावर उपभोग त्याची उपभोग प्रवृत्ती अवलंबून असते साधारणपणे उंची कापडाला श्रीमंताकडून मोठ्या प्रमाणात मागणी असते तर साध्या कापडाला गरिबान कडून मागणी असते उत्पन्नाचे विषम वाटप झाले असेल तर उलटी कापडाला मागणी कमी राहील व साध्या कापडाला जास्त राहिल्यावर उत्पन्नाचे समान वाटप झाले असेल तर साध्या व उंची कापडाची मागणी कमी होऊन मध्यम प्रतीच्या कापडाची मागणी वाढेल.

4 .उपभोक्त्याचे आवडनिवड अभिरुची व फॅशन यातील बदल

उपभोक्त्याचे एखाद्या वस्तू विषयी आवड निवड बदलली तर मागणीत बदल करण्याचा तसेच अभिरुचीत झालेला बदल घडवून आणतो उदाहरणार्थ जुन्या चित्रपट गाण्याची अभिरुची असलेला उपभोक्ता त्या गाण्याच्या कॅसेट सीडी ची मागणी करेल परंतु त्याच्या अभिरुचीत बदल झाला म्हणजे नाट्यसंगीताची आवड निर्माण झाली तर त्या कॅसेट सीडी ची मागणी करेल मध्ये झालेला बदल देखील मागणीत बदल घडवून आणतो वरील सर्व घटक मागणी ठरविणारे आहेत.

5 . पर्यायी वस्तूंची संख्या व किमती यातील बदल

जर एका वस्तूला अनेक पर्याय उपलब्ध असतील तर मागणी जास्त लवचिक असते कारण एखादा पर्याय बाजारातून नाहीसा झाला तर दुसऱ्या पर्यायांमध्ये त्या पर्यायाची मागणी विभागली जाते तसेच एका वस्तूला एकच पर्याय असेल तर मागणी अलवचिक असते त्यापैकी एक पर्याय बाजारातून नाहीसा झाला तर दुसऱ्या पर्यायाची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते उदाहरणार्थ अनेक प्रकारची शीतपेय बाजारात उपलब्ध असल्याने एखादे शीतपेय बाजारात झाल्यास इतर शीतपेयांची मागणी थोडी थोडी वाटते परंतु गूळ

HRM Micro Economics Spe.1

साखर हे एकाच एक पर्याय असल्याने गूळ बाजारात मिळू लागल्या साखरेची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढेल म्हणजे पर्यायांची संख्या मागणीवर परिणाम करत असते तसेच अनेक पर्यायांपैकी एका पर्यायाची किंमत वाढल्यास त्याची मागणी शून्यावर येऊन इतरांची मागणी वाढते पर्यायांमध्ये साखरेच्या किमतीत वाढ झाल्याने साखरेची मागणी घटते त्याबरोबरच गुळाचा खूप वाढतो म्हणजे पर्याय ची किंमत देखील मागणीत बदल घडवून आणते.

6. उपभोक्त्याच्या अपेक्षा

उपभोक्त्याच्या वस्तूच्या किमती विषयी पर्यायाच्या उपलब्धतेविषयी भविष्यकालीन ज्या अपेक्षा असतात त्या मागणीवर प्रभाव करीत असतात एखाद्या वस्तूची किंमत भविष्यकाळात वाढणार आहे असे त्यांना अपेक्षित असेल तर ते आजच म्हणजे वर्तमान काळात त्या वस्तूची मागणी वाढवितात याउलट भविष्यकाळात एखाद्या वस्तूची किंमत कमी होणार असे अपेक्षित असेल तर ते आजच म्हणजे वर्तमान काळात त्या वस्तूची मागणी वाढवितात याउलट भविष्यकाळात एखाद्या वस्तूची किंमत कमी होणार असे त्यांना अपेक्षित असेल तर आजची मागणी ते उद्यावर ढकलतात.

7. उपभोक्तायांची संख्या

उपभोक्त्याचे संख्या मागणी ठरवणारा महत्त्वाचा घटक आहे उपभोग त्यांची संख्या पुढील घटकावर अवलंबून असते.

अ) लोकसंख्येचे आकारमान

HRM Micro Economics Spe.1

लोकसंख्या वाढली की उपभोग त्यांची संख्या वाढते याउलट लोकसंख्या कमी झाले की उपभोग त्यांची संख्या घटते.

ब) लोकसंख्येची रचना

लोकसंख्येच्या रचनेत बदल झाल्याने देखील मागणीत बदल घडून येतो उदाहरणार्थ 0 ते 14 वयोगटातील लोकांचे प्रमाण जास्त असेल तर त्यांच्या कपड्यांची खेळण्याची पाठ्यपुस्तकाची मागणी वाढेल.

क**) वाहतूक व दळणवळण सोई**

यांचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला असेल तर उपभोक्ते एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी सहज जाऊ शकतात त्यामुळे उपभोक्त्याच्या संख्येत बदल होतो.

वरील तीनही घटक व उपभोक्त्याचे संख्या ठरवतात व त्यावरून मागणी ठरत असते.

8. जाहिरात

आधुनिक जगात जाहिरात हे मागणी ठरविण्याचे व बदलविण्याचे प्रवाही साधन मानले जाते सध्या अनेक दृक श्राव्य साधने व प्रसारमाध्यमे विकसित झाल्याने त्यामार्फत प्रभावी जाहिरात केली जाते म्हणून जाहिरात हादेखील महत्त्वाचा मागणी ठरविणाऱ्या घटक आहे वरील प्रमुख घटकांबरोबरच मागणीवर रूढी परंपरा चालीरीती नैसर्गिक परिस्थिती या घटकांचा परिणाम होतो.

3.3 मागणीचा नियम (LOW OF DEMAND)

HRM Micro Economics Spe 1

किमती बरोबरच मागणी व इतर घटकांचा परिणाम होत असतो उदाहरणार्थ उपभोक्त्याचे उत्पन्न लोकांच्या आवडीनिवडी सवयी इतर वस्तूंच्या किमती व उपभोक्तयांची संख्या पर यांची संख्या व किमती व त्यांच्या अपेक्षा जाहिरात इत्यादी परंतु परंपरागत मागणी विश्लेषण नुसार वस्तूची किंमत हा घटक महत्त्वाचा मानून मागणीवर होणारा परिणाम मागणी नियमात अभ्यासला जातो म्हणून इतर घटक स्थिर आहेत असे मानले तर मागणी नियमाची सत्यता पडताळून येते मागणी नियम स्पष्ट करण्यासाठी वस्तूंची किंमत व मागणी यांचा विचार करणे आवश्यक ठरते मागणीचा नियम पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल मागणीचा नियम

“इतर परिस्थिती कायम असताना वस्तूंची किंमत वाढली तर मागणीचा संकोच होतो वस्तूंची किंमत कमी झाली तर मागणीचा विस्तार होतो.”

मागणीचा नियम मागणी पत्रक व मागणी वक्राच्या स्पष्ट करता येतो.

मागणी पत्रक व मागणी वक्र

मागणी पत्रकाद्वारे मागणी नियमात स्पष्ट केल्याप्रमाणे वस्तूची किंमत व वस्तूची मागणी यांचा संबंध अनेक गणिती पद्धतीने स्पष्ट करता येतो. वेगवेगळ्या किमती असल्यास ग्राहक **विशिष्ट वेळी विशिष्ट वस्तूंची किती नगसंख्या खरेदी करण्यास तयार होईल हे ज्या पत्रकाद्वारे दर्शविले जाते त्याला मागणी पत्रक म्हणतात मागणी पत्र कालात मागणी ते कोष्टक किंवा तक्ता असे म्हणतात.**

HRM Micro Economics Spe.1

तक्ता क्र. 3.1 : मागणीपत्रक	
द्राक्षाची किंमत (₹ प्रति किलो)	द्राक्षाची मागणी (किलोग्रॅम)
18.00 ₹	1 कि.ग्रॅ.
16.00 ₹	2 कि.ग्रॅ.
14.00 ₹	3 कि.ग्रॅ.
12.00 ₹	4 कि.ग्रॅ.
10.00 ₹	5 कि.ग्रॅ.

मागणीपत्रका वरून असे दिसते की, द्राक्षाची किंमत जशी 16, 14,12, 10 रुपयांपर्यंत घटते. तसतशी द्राक्षांची मागणी अनुक्रमे 2,3, 4,5 कि. ग्रॅ.पर्यंत वाढते तसतशी द्राक्षाची मागणी कमी होत जाते. या मागणी पत्रकावरून किंमत व मागणी यातील व्यस्त संबंध स्पष्ट होतो.



आकृतीवरील मागणी पत्रकावरून खालील प्रमाणे मागणी वक्र दाखवता येतो.

आकृतीत अक्ष अक्षावर वस्तूची मागणी दर्शवली असून अय अक्षावर वस्तूची किंमत दर्शवली आहे.P हे अक्षर किमतीसाठी तर Q हे अक्षर मागणीसाठी दर्शवले आहे. आकृतीत DD हा मागणी वक्र आहे.OP या किमतीला OQ ही मूळ मागणी वक्रावर E

बिंदूत दर्शवली आहे. किंमत वाढून OP 1 झाल्यास मागणी घटून OQ1 एवढी होते.असे मागणी वक्रावरील E1 बिंदू दर्शवतो.तसेच किंमत OP2 इतकी झाल्यास मागणी वाढून OQ2 एवढी होते. असे मागणी वक्रावरील E2 या बिंदू वरून दर्शवले आहे. येथेही या मागणी वक्रावरील किंमत व मागणी यातील व्यस्त संबंध स्पष्ट होतो.

मागणी वक्र डावीकडून उजवीकडे उतरत येणारा म्हणजे खाली येणारा असतो.

मागणी वक्राची वैशिष्ट्ये

1 मागणी वक्र हा डावीकडून उजवीकडे वरून खाली उतरत जाणारा म्हणजेच ऋणात्मक आकाराचा असतो.

2 मागणी वक्र हा किंमत व मागणीतील विरोधी किंवा व्यस्त संबंध दर्शवितो.

3 मागणी वक्र हा आरंभ बिंदूशी बहिर्गोल स्वरूपाचा असतो.

4 मागणी वक्र कधीही x किंवा y पक्षांना स्पर्श करीत नसतो तर तो दोन आसाम मध्ये अर्धचंद्राकृती अशा आकाराचा आढळतो.

मागणी नियमाची वैशिष्ट्ये

1. व्यस्त संबंध मागणी नियमात सांगितल्याप्रमाणे किंमत व मागणी या दोन चला मध्ये व्यस्त संबंध असतो.
2. मागणी हे किमतीचे फलन असते[D=f(P)]: म्हणजेच किंमत हा घटक स्वतंत्र झाला असून मागणी हे परतंत्र चल आहे मागणी नियमात किमतीच्या मागणीवर होणारा परिणाम अपेक्षित आहे मागणीच्या किमतीवर नव्हे.

HRM Micro Economics Spe.1

3. कालदृष्ट्या गती शून्यत्व: मागणी वक्र हा विशिष्ट वेळेतील किंमत मागणी संबंधित दर्शवितो कालावधी बदलल्यानंतर किंमत बदलाचा मागणीवर होणारा परिणाम वेगळा असतो.
4. इतर परिस्थिती कायम: किमती शिवाय इतर सर्व घटक विजय मागणीवर प्रभाव करतात ते सर्व स्थिर आहेत असे गृहीत मानून नियम सिद्ध केला जातो व खरा ठरत असतो परंतु इतर घटकांचा मागणी वापरावर होणारा परिणाम नवीन मागणी वक्र काढून दाखविला जातो.

मागणी नियमाचे अपवाद

मागणीच्या नियमाचे अपवाद: वरील मागणी नियमाला अपवाद आहे ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

Economics Spe.1

1.जीवनावश्यक वस्तू / आवश्यक वस्तू

जीवनावश्यक वस्तूंच्या मागणीवर किंमत वाढीचा किंवा घटनेचा परिणाम घडून येत नाही. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी प्रत्येकाची धडपड सुरू असते. या वस्तूंच्या किमतीत वाढ झाली तरी मागणीत घट होत नाही. तसेच किमतीत घट झाली तरी मागणी वाढत नाही.

जीवनावश्यक वस्तूंच्या बाबतीत मागणीचा नियम प्रत्ययास येऊ शकत नाही. कारण अन्नधान्य, मीठ या वस्तू मानवाला जीवन जगण्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत. त्यामुळे या वस्तूंच्या किमतीत वाढ अथवा घट झाली तरी त्या वस्तूंच्या मागणीवर काहीच परिणाम होत नाही. कारण या वस्तू मानवी जीवनाचा मुख्य आधार आहेत. मग ती व्यक्ती कितीही श्रीमंत असो अथवा गरीब असो त्यांना वरील वस्तूंचा उपभोग घ्यावाच लागतो .

या वस्तूंच्या किमतीत वाढ झाल्यामुळे उपभोग कमी करता येत नाही व किमतीत घट झाल्यामुळे उपभोग वाढवता येत नाही.

HRM Micro Economics Spe.1

2. प्रतिष्ठेच्या वस्तू

काहि वस्तूंचा वापर सामाजिक दृष्ट्या प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा असतो. उदा.हिरे सोने, मोती ,दुर्मिळ वस्तू इत्यादी अशा वस्तूंच्या किमतीत घट झाली तर सामान्य व्यक्ती त्या वस्तूंची मागणी करत नाही. म्हणजेच किमतीत घट होऊ नये अशा वस्तूंची मागणी वाढत नाही. त्या वस्तूंच्या किमतीत वाढ झाली तरीहि समाजातील श्रीमंत वर्ग आपली प्रतिष्ठा टिकून ठेवण्यासाठी या वस्तूंच्या मागणीत घट करत नाही.

3. अज्ञान

ग्राहकांना बाजारपेठेविषयी ते संपूर्ण ज्ञान असते असे नाही. जेव्हा ग्राहकांना बाजारपेठेत वस्तूंची खरेदी करताना त्या वस्तूंच्या किमती विषयी काहीच माहीत नसते किंमत जास्त वस्तूचा दर्जा उच्च किंमत कमी दर्जा सुमार असा गैरसमज निर्माण होतो.तेव्हा ते कमी किंमत असतानाही जास्त मागणी करत नाही व जास्त किमतीला कमी मागणी करत नाहीत.म्हणजेच ते त्यांचे वर्तन मागणी नियमाच्या विरुद्ध असते.

4.जाहिरातबाजी

आजचे युग हे जाहिरातबाजीचे युग म्हणून ओळखले जाते. यामध्ये प्रत्येक वस्तूचे उत्पादन करणारा उत्पादक आपल्या वस्तूची जाहिरात प्रभावीपणे व परिणामकारक करत असतात. या जाहिरातीतून ग्राहकांना सांगतात की वस्तूच्या किंमतीत जरी वाढ झाली असली तरी तिच्या दर्जामध्ये ही वाढ केलेली असते.तसेच त्या वस्तूमध्ये आम्ही काय नवीन बदल केलेले आहेत हे एखाद्या अभिनेत्री, अभिनेता किंवा क्रिकेटपटूची मदत घेऊन जाहिरातबाजी करत असतात.

5.भविष्यकालीन अंदाज

भविष्यकाळात एखाद्या वस्तूच्या किंमतीत आणखी वाढ होणार आहे असा लोकांचा अंदाज असेल तर आज वस्तूच्या किंमतीत वाढ झालेली असताना त्या वस्तूची मागणी कमी होण्याऐवजी वाढते.

उदा.बाजारात तांदळाची किंमत 20 किलो वरून 25 किलोपर्यंत वाढली तर मागणीच्या नियमाप्रमाणे तांदळाची मागणी कमी व्हायला पाहिजे. पण लोकांचा अंदाज असेल कि काही दिवसांनी हाच तांदूळ 28 रुपये किलोने होईल तर तांदळाची किंमत

HRM Micro Economics Spe.I

वाढूनही तांदळाच्या मागणीत वाढ झालेली दिसून येते. याउलट तांदळाची किंमत जर कमी झाली तर पुढे आणखी कमी होणार आहे असा लोकांचा अंदाज असेल तर सध्या किंमत कमी झालेली असताना सुद्धा लोकं तांदळाची मागणी वाढण्याऐवजी कमी करतात.

6. गिफेन वस्तू /गिफेनचा विरोधाभास

सर रॉबर्ट गिफेन या अर्थशास्त्रज्ञाने हलक्या प्रतीच्या वस्तूंबाबत मागणीचा नियम कार्यान्वित होत नाही, असे सांगितले आहे.निकृष्ट प्रतीच्या वस्तूची किंमत कमी झाली असताना मागणीसुद्धा घट होते तसेच किंमत वाढल्यास मागणीही वाढते.

उदा.मका,हायब्रीड ज्वारी, बाजरी, जाडेभरडे कापड इत्यादी वस्तूंच्या बाबतीत असे आढळते की, एखाद्या हलक्या प्रतीच्या वस्तूची किंमत कमी झाली तर त्या व्यक्तीचे वास्तव उत्पन्न वाढते. त्यामुळे ती व्यक्ती अधिक चांगल्या दर्जाच्या वस्तूवर पैसे खर्च करण्यास तयार होते.त्याचबरोबर किंमती उतरलेल्या हलक्या प्रतीच्या वस्तूंची किंमत कमी होऊनही मागणी कमी होते. परंतु संपूर्ण बाजारपेठेचा विचार करता हा विरोधाभास तितकासा महत्त्वाचा ठरत नाही. कारण जी वस्तू एखाद्या व्यक्तीच्या दृष्टीने निकृष्ट असते तिच वस्तू इतरांच्या दृष्टीने चांगलीही असू शकते.

सर रॉबर्ट गिफेन या ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञाने निकृष्ट दर्जाच्या वस्तूबाबत मागणी नियमाला अपवाद दर्शवला आहे.यालाच गिफेनचा विरोधाभास असे म्हणतात.

तसेच निकृष्ट दर्जाच्या वस्तूंना गिफेन वस्तू असे म्हणतात.

बाजरी ,ज्वारी, मका यांसारख्या निकृष्ट दर्जाच्या वस्तूंच्या किमती कमी झाल्यास अशा वस्तू खरेदी करणाऱ्या उपभोक्त्याचे वास्तव उत्पन्न वाढते. म्हणजेच पूर्वीच्या उत्पन्नात किमती कमी झाल्याने जास्त वस्तू खरेदी करू शकतात परंतु प्रत्यक्षात मात्र उपभोक्ते

HRM Micro Economics Spe.1

निकृष्ट दर्जाच्या वस्तूंऐवजी उच्च दर्जाच्या वस्तूंची मागणी वाढवतात. म्हणजेच निकृष्ट दर्जाच्या वस्तूंची किंमत कमी होऊनही मागणी नियमानुसार त्यांची मागणी न वाढता ती घटताना दिसते. म्हणजेच हा मागणी नियमाला अपवाद आहे. म्हणून गिफेन वस्तूंचा मागणी वक्र सामान्य वस्तूंच्या मागणी व वक्राच्या विरोधी म्हणजे खालून वर जाणारा धनात्मक आकाराचा दिसून येतो.



आकृती

वरील आकृतीत DD हा गिफेन वस्तूचा मागणी वक्र आहे. की जो धनात्मक आकाराचा आढळतो.तो OP ही मूळ किंमत असताना OQ ही मूळ मागणी आहे असे दर्शवतो.OP1 एवढी गिफेन वस्तूंची किंमत कमी होऊन त्याची मागणी न वाढता OQ1 एवढी कमी होते. असे E1 बिंदू दर्शवतो, जो मागणी नियमाला अपवाद दर्शवितो. DD हा मागणी वक्र किंमत व मागणीतील संबंध दर्शवतो. जो मागणी नियमाला अपवाद दर्शवतो.

7. युद्ध

युद्धाच्या काळात वस्तूची टंचाई निर्माण होईल असे उपभोक्ता यांच्या असते त्यामुळे उपभोक्ते वस्तूंचा साठा करतात अशावेळी किंमत वाढ होऊनही करण्यासाठी मागणी केली जाते.

8. मंदी

मंदीच्या काळात वस्तूंच्या किमती कमी असतात तरी मागणी फारच कमी असते मागणी न वाढण्याचे कारण म्हणजे ग्राहकांची क्रयशक्ती कमी झालेली असते.

9. सट्टेबाजी

एखाद्या वस्तूची किंमत वाढत असून भविष्यकाळात अधिक वाढण्याची शक्यता असल्यास लोक वाढत्या किमतीला त्या वस्तूचे अधिक खरेदी करतात म्हणजे किंमत वाढत असतानाही मागणी वाढतच राहते उदाहरणार्थ शहरी भागातील लोखंडाच्या किमती.

3.3.1 बाजारातील मागणी

वैयक्तिक मागणी ही व्यक्तिगत उपभोक्त्याची वेगवेगळ्या किमतींना असणारे वस्तूची मागणी दर्शविते. तर "**बाजार मागणी म्हणजे विशिष्ट किमतीला बाजारात असणाऱ्या सर्व उपभोक्त्यांची मागणीची एकत्रित बेरीज होय.**"

बाजारात उपभोक्त्यांची संख्या जेवढी जास्त तेवढा प्रमाणात बाजार मागणी जास्त असते. बाजारात उपभोक्त्यांची संख्या कमी असेल तर बाजार मागणी कमी राहते.वैयक्तिक मागणीप्रमाणेच वेगवेगळ्या किमतींना बाजार मागणी भिन्नभिन्न असते. बाजार मागणीच्या संकल्पनेत वैयक्तिक मागणी व किंमत संबंधा प्रमाणेच वस्तूची किंमत आणि वस्तूची मागणी यात व्यस्त संबंध असतो.

HRM Micro Economics Spe.1

बाजार मागणी पत्रक

बाजारपेठेत असंख्य ग्राहक असतात ते ग्राहक बाजारपेठेतील निरनिराळ्या किमतींना वस्तूंची मागणी करतात. त्यांच्या मागणीची एकत्रित बेरीज केली असता बाजारपेठेत असणारी एकूण मागणी समजते. ही एकत्रित मागणी या पत्रकात दर्शविली जाते त्या पत्रकास बाजार मागणी पत्र असे म्हणतात.

उदा.बाजारपेठेत 1000 ग्राहक आहेत असे समजू, या ग्राहकांनी बाजारपेठेतील निरनिराळ्या किमतींना आपली मागणी केलेली असते.

" **बाजार मागणी पत्रक म्हणजे बाजारात वस्तूंची किंमत वेगवेगळी असताना सर्व उपभोक्ते एकत्रित वस्तूंची किती नगसंख्या खरेदी करतात याविषयी परस्पर संबंध दर्शवणारा तक्ता होय.**"

बाजार मागणी पत्रकात डाव्या बाजूच्या रकान्यात आंबे प्रति किलो किंमत रुपयांमध्ये आणि उजव्या रकान्यात प्रत्येक किमतीच्या अनुषंगाने सर्व उपभोक्ते खरेदी करत असलेल्या आंब्याची एकूण मागणी किलोमध्ये दर्शविली आहे.

बाजार मागणी पत्रक

आंबे किंमत (प्रतिकिलो) (₹)	मागणी (किलो)
10	8000
20	7000
30	6000
40	5000
50	4000

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की बाजारपेठेतील ग्राहकांनी वस्तूंच्या निरनिराळ्या

HRM Micro Economics Spe.1

किमतींना वस्तूची मागणी केलेली आहे.जसे आंब्याची किंमत रुपये 10किलो असताना सर्व ग्राहकांकडून 8000 किलो आंब्याची मागणी केली जाते. आंबे प्रतिकिलो रुपये 30 झाल्यास बाजारातील एकूण मागणीत 6000 किलो केली जाते. आणि किंमत 50 रुपये प्रतिकिलो झाली असता 4000 किलोची मागणी केली जाते.

आकृती



आकृतीत अक्ष अक्षावर आंब्याची मागणी हजार किलो मध्ये अक्षर आंब्याची प्रति किलो किंमत रुपयांमध्ये दर्शविलेली आहे.मम1 हा बाजार मागणीवक्र आहे.बाजार मागणीवक्र वैयक्तिक मागणी वक्रापेक्षा वरून खाली डावीकडून उजवीकडे उतरता जाणारा असतो. बाजार मागणीवर वक्रावरून प्रतिकिलो आंब्याची किंमत घातल्यावर बाजार मागणी वाढ होते आणि प्रति किलो आंब्यांची किंमत घटल्यास बाजार मागणीत वाढ होते आणि आंब्याची प्रति किलो किंमत वाढल्यास आंब्याची मागणी घटते हे स्पष्ट होते.

“ बाजारातील अनेक ग्राहकांच्या मागणीचा एकत्रीकरण म्हणजे बाजारातील मागणी किंवा एकूण मागणी होय.” बाजारातील मागणी म्हणजे बाजारातील अनेक ग्राहकांच्या मागणीवर

बाजारात अनेक ग्राहक असतात ते एकाच किमतीला वस्तूंचे वेगवेगळे नग खरेदी करत असतात.कारण वेगवेगळ्या लोकांसाठी एकाच वस्तूची उपयोगिता वेगवेगळी असते. त्यामुळे ते वस्तूची खरेदी कमी जास्त करतात.

ज्या व्यक्तीला वस्तूची उपयोगिता अधिक वाटते ती व्यक्ती त्या वस्तूंचे अधिक नग खरेदी करते. तर ज्या व्यक्तीला त्या वस्तूची किंमत कमी कमी उपयोगिता वाटते ती व्यक्ती त्या वस्तूचे कमी नग खरेदि करते म्हणजे बाजारात एकाच किमतीला वेगवेगळ्या ग्राहक वस्तूची कमी अधिक खरेदी करत असतात. यानुसार बाजारातील मागणी पत्रक तयार करता येते.वस्तूच्या वेगवेगळ्या किमती असताना बाजारातील वेगवेगळ्या ग्राहकांचे त्या वस्तूला असलेल्या मागणी ते कोष्टक म्हणजेच बाजार मागणी पत्रक होय.

बाजार मागणीचे महत्व :-

उदा. औद्योगिक उपभोक्ते ,संस्थात्मक उपभोक्ते आणि वैयक्तिक उपभोक्ते बाजार मागणीवरून प्रदेशवार मागणी समजते. उदा. जिल्हा, राज्य, संपूर्ण देश बाजार मागणी आराखडा, महिना ,तीन महिने ,अथवा वार्षिक दर्शवली जाते.

1.बाजार मागणीवरून एखाद्या उद्योगाच्या विशिष्ट उत्पादनाला एकूण मागणी किती आहे हे समजते.

2.उद्योगातील वस्तूंची विक्री करून किती उत्पन्न मिळेल हे समजते .

3.बाजार मागणीवरून वस्तूंची मागणी किती नोंदविण्यात आली,हे समजते.

4.प्रत्यक्ष ग्राहकांपर्यंत किती वस्तू पोहोचल्या, ग्राहकांनी किती वस्तूंचा उपभोग घेतला, हे समजते.

HRM Micro Economics Spe.1

5. बाजार मागणीवरून वस्तूंची मागणी किती नोंदवण्यात आली. प्रत्यक्ष ग्राहकांपर्यंत किती वस्तू पोहोचल्या हे समजते.

6.ग्राहकांनी किती वस्तूंचा उपभोग घेतला हे समजते.

7.बाजार मागणीवरून उपभोग त्यांच्या वेगवेगळ्या गटांनी किती मागणी नोंदवली हे समजते.

8.बाजार मागणी अनेक घटकांवरून ठरते त्यामुळे बाजाराचे पर्यावरण समजते.

9.आर्थिक, सामाजिक सांस्कृतिक -राजकीय घटकांचा प्रभाव समजतो.

10.बाजार मागणीही विपणन विषयक कार्यक्रम किंवा व्यूहरचनेवरून समजते.

3.4 मागणीची लवचिकता अर्थ आणि प्रकार:-

कुर्नो आणि मिल या अर्थशास्त्रज्ञांनी प्रथम मागणीच्या लवचिकतेची कल्पना मांडली. परंतु अलीकडे मार्शल यांनी मागणीच्या लवचिकतेचे अधिक विश्लेषण केले. मागणीचा सिद्धांत यावरून किंमत वाढ अथवा वस्तूच्या मागणीसुद्धा वाढ अथवा घट होते हे समजते. मात्र किमतीत विशिष्ट प्रमाणात बदल झाल्यास मागणीत किती प्रमाणात बदल होतो हे समजत नाही .वस्तूची किंमत व मागणीत परस्पर संबंध कसा असतो हे समजत नाही. म्हणून वस्तूची किंमत व मागणी या दोघांतील परस्पर संबंधाची कल्पना येण्यासाठी मागणीची लवचिकता संकल्पना उपयुक्त ठरते.

HRM Micro Economics Spe.1

मागणीच्या लवचिकतेची व्याख्या

Price Elasticity : Definitions

1 किमतीत बदल झाल्यामुळे मागणीत जे बदल घडून येतात त्या बदलांच्या प्रमाणाला मागणीची लवचिकता असे म्हणतात.

2. मागणीतील बदलाचे प्रमाण आणि किमतीतील बदलांचे प्रमाण यांच्यातील गुणोत्तर प्रमाणास मागणीची लवचिकता असे म्हणतात.

3. वस्तूच्या किमतीतील बदलामुळे वस्तूच्या मागणीत जे कमी-जास्त प्रमाणात बदल होतात. त्या बदलाच्या प्रमाणाला मागणीची लवचिकता असे म्हणतात .

डॉ. मार्शल

4. वस्तूच्या किमतीतील बदलांना मागणी नगसंख्याकडून मिळणाऱ्या प्रतिसादाचे प्रमाण म्हणजे मागणीची लवचिकता होय.

प्रा.आर. जी. लिप्से

मागणीची लवचिकता = <u>वस्तूच्या मागणीतील शेकडा बदल</u>

वस्तूच्या मागणीवर परिणाम करणाऱ्या

घटकातील बदलाचे शेकडा बदल

येणाऱ्या गुणोत्तर आवरून मागणी लवचिक आहे की अलवचिक आहे अथवा एक अनंत किंवा शून्य लवचिक आहे हे ठरवले जाते.

HRM Micro Economics Spe.1

मागणीच्या लवचिकतेचे प्रकार:

Types of Elasticity of Demand

मागणीची लवचिकता वस्तूच्या किमतीतील बदलाचे प्रमाण, उपभोक्त्याच्या उत्पन्नातील बदलाचे प्रमाण, अथवा पर्यायी, पूरक वस्तूंच्या किमतीतील बदलाच्या प्रमाणावरून ठरत असल्याने मागणीच्या लवचिकतेचे मुख्य तीन प्रकार पडतात.

1 मागणीची किंमत लवचिकता Price Elastictiy of Demand

2 मागणीची उत्पन्न लवचिकता Income Elastictiy of Demand

3 मागणीची तिरकस/ छेदक लवचिकता Cross Elastictiy of Demand

3.4 मागणीची लवचिकता

मागणी नियमानुसार इतर परिस्थिती कायम असताना वस्तूची किंमत वाढल्यास वस्तूची मागणी घटते आणि वस्तूची किंमत घातल्यास वस्तूची मागणी वाढते मात्र वस्तूंच्या किमतीतील बदलांच्या अनुषंगाने वस्तूच्या मागणीत किती प्रमाणात बदल होतो हे समजत नाही मागणीची वृद्धी आणि मागणीतील घटक या संकल्पनांच्या साहाय्याने व्यतिरिक्त उपभोक्त्याचे उत्पन्न पर्यायी वस्तूंच्या किमती लोकांच्या आवडीनिवडी बदलल्या वस्तूच्या मागणी किती प्रमाणात वाढ अथवा घट होईल हे समजत नाही वस्तूची किंमत वस्तूंच्या किमती व्यतिरिक्त वस्तूच्या मागणीवर परिणाम करणाऱ्या बदल झाल्यास वस्तूची मागणी किती प्रमाणात बदलते याचे आकलन होण्यासाठी आर्थिक विश्लेषण मागणीची लवचिकता ही संकल्पना उपयुक्त ठरते. kurno व मिल या अर्थशास्त्रज्ञांनी प्रथम मागणीची लवचिकता ही संकल्पना मांडली प्रा डॉक्टर मार्शल यांनी मागणीची लवचिकता ही संकल्पना लोकप्रिय केली.

मागणीच्या लवचिकतेचे व्याख्या:

"वस्तूंच्या किमतीत बदल झाल्यास वस्तूच्या मागणीत होणाऱ्या बदलाचे प्रमाण म्हणजे मागणीची लवचिकता होय."

वस्तूच्या मागणीवर परिणाम करणाऱ्या कोणत्याही एका निर्धारकात (वस्तूची किंमत उपभोक्त्याचे उत्पन्न पर्यायी वस्तूंच्या किमती) बदल झाल्यास वस्तूच्या मागणीच्या प्रमाणात बदल होतो त्याबद्दल याचे प्रमाण म्हणजे मागणीची लवचिकता.

HRM Micro Economics Spe.I

मागणीची लवचिकता वस्तूच्या मागणीतील बदलाचे प्रमाण संबंधित वस्तूची किंमत ग्राहकाचे उत्पन्न पर्यायी वस्तूंच्या किमतीतील बदलाचे प्रमाण यांच्या गुणोत्तर यावरून ठरते मागणीच्या लवचिकतेचे मापन करण्यासाठी वस्तूच्या मागणीतील बदलांचे शेकडा प्रमाण आणि वस्तूच्या मागणीवर परिणाम करणाऱ्या घटकातील बदलांचे शेकडा प्रमाण काढले जाते येणाऱ्या गुणोत्तर आवरून मागणी लवचिक आहे की अलवचिक आहे अथवा एकक लवचिक अनंत लवचिक किंवा शून्य लवचिक आहे हे ठरविले जाते.

मागणीच्या लवचिकतेचे प्रकार

मागणीची लवचिकता वस्तूंच्या किमतीतील बदलाचे प्रमाण उपभोग त्यांच्या उत्पन्नातील बदलांचे प्रमाण अथवा पर्यायी/पूरक वस्तूंच्या किमतीतील बदलाच्या प्रमाणावरून ठरत असल्याने मागणीच्या लवचिकतेचे प्रमुख तीन प्रकार पडतात

1 मागणीची किंमत लवचिकता

2 मागणीची उत्पन्न लवचिकता

3 मागणीची छेदक लवचिकता

3.4.1 मागणीची किंमत लवचिकता:

अर्थ,प्रकार,मापन,उपयोग,महत्त्व ,निर्धारक घटक

मागणीची किंमत लवचिकता व्याख्या

डॉ. मार्शल ने लवचिकतेची संकल्पना किंमत बदलाच्या संदर्भात मांडली या लवचिक तिला किंमत लवचिकता असे म्हणता येईल.किंमत कमी झाल्यामुळे

HRM Micro Economics Spe.1

मागणीत होणारे कमी किंवा जास्त वाढ तसेच किंमत वाढल्यामुळे मागणी होणारी कमी किंवा जास्त गट म्हणजेच मागणीची लवचिकता होय.

वस्तूच्या मागणी परिमाण आतील शेकडा बदलाचे किमतीतील शेकडा बदलाशी असलेले प्रमाण म्हणजेच मागणीची लवचिकता होय.

किमतीत होणाऱ्या प्रमाणशीर बदलाची मागणी केल्या जाणाऱ्या नगसंख्येत होणाऱ्या प्रमाणशीर बदलाचे ते गुणोत्तर असते त्याला मागणीची किंमत लवचिकता असे म्हणतात.

मागणीच्या किंमत लवचिकतेचे प्रकार

किमतीतील बदलाचा मागणीवर किती प्रभाव पडतो यावरून किंमत लवचिकता पुढील प्रकार दिसून येतात

1.पूर्णपणे लवचिक मागणी

2.पूर्णपणे अलवचिक मागणी

3.एकक लवचिकता

4.लवचिक मागणी

5.कमी लवचिक मागणी

1. पूर्णपणे लवचिक मागणी

किमतीत अत्यल्प वाढ झाल्याने मागणी शून्यापर्यंत घटत असेल किंवा किमतीत अत्यल्प घट झाल्याने मागणी अनंतापर्यंत वाढत असेल तेव्हा त्याला पूर्णपणे लवचिक मागणी असे म्हणतात.

HRM Micro Economics Spe.1



आकृती क्र. 3.3 : पूर्णपणे लवचीक मागणी

अशा परिस्थितीत मागणी अतिसंवेदनशील असल्याने मागणीची लवचिकता अनंत असते हा प्रकार व्यवहारात क्वचित आढळतो किंवा आढळत नाही.

उदा.किमतीत काहीही बदल न होता जर मागणी 20 % वाढत असेल तर मागणीची लवचिकता किती?

EP = 20/0 = अनंत

अशावेळी मागणी वक्र OX अक्षाला समांतर राहील.

2. पूर्णपणे अलवचिक मागणी

किमतीत फार मोठ्या प्रमाणात बदल होऊनही मागणीत मात्र कोणताही बदल होत नसेल तर त्या मागणीला पूर्णपणे अलवचिक मागणी अ असे म्हणतात त्याला शून्य लवचिकता असेही म्हणतात. अशा परिस्थितीत मागणी अजिबात संवेदनक्षम नसते हा प्रकार आहे व्यवहारात क्वचितच आढळतो.

HRM Micro Economics Spe.1



आकृती क्र. 3.4 : पूर्णपणे अलवचीक मागणी

उदा.किमतीत 20 % वाढ होत असेल तर तरीही मागणीत कोणत्याही प्रकारची घट होत नसेल तर,

EP = 0/20 = 0

अशा वेळी मागणी वक्र OX अक्षाला समांतर राहील.

3. एकक लवचिकता

किमतीत जितक्या प्रमाणात बदल होतो तितक्याच प्रमाणात मागणी बदल होत असेल तर मागणीची लवचिकता एका बरोबर असते त्या लवचिकतेला एक लवचिकता असे म्हणतात.

HRM Micro Economics Spe.1



उदा.किमतीत 20 % वाढ होत असेल व मागणीत 20 % घट होत असेल तर,

EP = 20 %/20 %= 1

मागणी वक्र चा आकार आयताकृती असतो

4. लवचिक मागणी

किमतीत होणाऱ्या अल्पशा बदलामुळे मागणी जर मोठ्या प्रमाणात बदल घडून येत असेल तर ती मागणी सापेक्षतेने लवचिक असते किंवा मागणीची लवचिकता एकापेक्षा जास्त असते.

आकृती

HRM Micro Economics Spe.1



आकृती क्र. 3.6 : लवचीक मागणी

उदा.किमतीत 20 % घट होत असेल व त्याला अनुसरून मागणीत 40 % वाढ होत असेल तर

EP = 40/20 = 2

मागणी वक्र वरून खाली येणारा उथळ किंवा कमी उताराचा असेल

5. कमी लवचिक मागणी

किमतीतील बदलाच्या तुलनेत जर मागणीत होणारा बदल कमी असेल तर मागणी एकापेक्षा कमी लवचिक असते.

आकृती

HRM Micro Economics pe.1



आकृती क्र. 3.7 : कमी लवचीक मागणी

उदा.किमतीत 40 टक्के वाढ होत असेल तर त्यांना अनुसरून मागणीत फक्त 20 टक्के घट होत असेल तर

EP = 20/40 = 0.5

येथे मागणी वक्र वरून खाली येणारा अधिक उताराचा असतो

HRM Micro Economics Spe.1

किंमत लवचिकता मोजण्याच्या पद्धती

मागणीच्या लवचिकतेचे मापन लवचिकता संकल्पनेचे महत्त्व तिच्या मनावर अवलंबून असते आता आपण किंमत लवचिकता मोजण्याच्या पद्धतीचा अभ्यास करणार आहोत **किंमत लवचिकता मोजण्याच्या पद्धती** पुढीलप्रमाणे:



1.बिंदू पद्धती

किंमत व मागणी यातील शेकडा बद्दल मोजणी व्यतिरिक्त इतर तीन पद्धतीचा विचार अर्थतज्ज्ञांनी केला आहे त्यातील एक पद्धती म्हणजे बिंदू पद्धती होय डॉक्टर मार्शल यांनी ही पद्धत सुचविली आहे या पद्धतीनुसार आपण दोन्ही पक्षांना जोडणारा सरळ रेषीय मागणी वक्र घेतला आणि वापरावरील अतिशय जवळच्या दोन बिंदू तील लवचिकता या पद्धतीने मोजू शकतो मूलतः ही भूमिती पद्धत असून तिथे मोजमाप बीच गणिती पद्धतीने पुढील सूत्राच्या साह्याने करता येते.

HRM Micro-1

2.वक्रांश पद्धती

या पद्धतीत मागणी वापरावरील अतिशय जवळचे दोन बिंदू लक्षात घेण्याऐवजी त्या वापरावरील लहान तुकडा लक्षात घेतला जातो म्हणून ती वक्रांश पद्धती होती या पद्धतीमुळे मागणी व किंमत यातील बदल लक्षात घेता येतात कारण व्यवहारात अत्यल्प बदल शोधणे अवघड असते व पद्धती देखील बीजगणित सूत्ररुपाने उपयोगात आणता येते.

3. एकूण प्राप्ती किंवा एकूण खर्च पद्धती

या पद्धतीत व्यवसाय संस्थेला होणारे एकूण प्राप्त होतील बदलावरून मागणीची लवचिकता काढली जाते उपयोग त्यांनी केलेल्या खर्चामुळे व्यवसाय संस्थेला प्राप्ती मिळत असल्याने व्यवसाय संस्थेची प्राप्ती व उपभोग त्यांचा एकूण खर्च यामध्ये समानता निर्माण होते या पद्धतीनुसार मागणीच्या लवचिकतेचे तीन प्रकार दिसून येतात.

I)जास्त लवचिक मागणी (EP > 1)

किंमत कमी होत असताना व्यवसाय संस्थेचे एकूण प्राप्ती वाढत असेल तर मागणी जास्त लवचिक असते.

II) एकक लवचिकता (EP = 1)

किंमत कमी होत असताना प्राप्ती कायम राहत असेल तर लवचिकता एक असते.

III) अलवचिक मागणी (EP < 1)

HRM Micro Economics Spe.1

किंमत कमी होत असताना प्राप्ती सुद्धा कमी होत असेल तर मागणीची लवचिकता एकापेक्षा कमी किंवा लवचिक असते.

तक्ता

तक्ता क्र. 3.4 : बाजारातील मागणी-पुरवठा समतोल

किंमत	एकूण पुरवठा	एकूण मागणी	पुरवठ्यातील आधिक्य (+) किंवा मागणीतील न्यूनता (–)	किमतीवरील प्रभाव
6	7,000	2,000	+ 5,000	घट
5	6,500	3,000	+ 3,500	घट
4	6,000	4,000	+ 2,000	घट
3	5,000	5,000	0000	तटस्थ/स्थिरता
2	4,000	5,500	– 1,500	वाढ
1	3,000	6,000	– 3,000	वाढ

मागणीच्या लवचिकतेचे उपयोग आणि महत्त्व

1 उत्पादकता वस्तूची किंमत ठरविताना :

प्रत्येक उद्योग संस्थेचे व उत्पादकाचे जास्त नफा मिळविणे हे मुख्य उद्दिष्ट असते हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एक तरी किमती वाढवून किंवा विक्री वाढवून नफा मिळविता येतो जर उत्पादनाची मागणी लवचिक असेल तर किंमत वाढविता येईल याउलट मागणी

HRM Mane.1

जर लवचिक असेल तर किंमत कमी करून विक्री वाढवून नफा मिळविता येईल म्हणजे किंमत ठरविताना उत्पादकाला त्याच्या वस्तूची मागणीची लवचिकता लक्षात घ्यावी लागेल.

2.उत्पादन घटकांचे मोबदले ठरविताना :

उत्पादन घटकाची मागणीची लवचिकता कशा प्रकारचे आहे त्यानुसार त्यांचा मोबदला दिला जात असतो अलवचिक मागणी असणाऱ्या उत्पादक घटकांना त्यांचा मोबदला वाढविता येतो परंतु लवचिक मागणी असणाऱ्या उत्पादन घटकांना दिला जाणारा मोबदला कमी असतो तसेच एका उत्पादन घटक आवेगी दुसरा उत्पादन घटकाचा वापर उत्पादनासाठी करावयाचा असतो तेव्हा त्या उत्पादन घटकाची मागणीची लवचिकता लक्षात घ्यावी लागते.

3. अर्थमंत्र्यांना कर विषयक धोरण ठरविताना:

करम पासून उत्पन्न मिळविण्याचा सरकारचा येतो असतो तेव्हा अलवचिक मागणी असणाऱ्या वस्तू वर जास्त करा करतात त्यामुळे हमखासपने उत्पन्न मिळते लवचिक मागणी असणाऱ्या वस्तूंवर कमी कर नाकारले जातात जास्त कर आकारले तर तशा प्रकारचे उद्योग धोक्यात येण्याची शक्यता असते अर्थमंत्रालय त्याचा वापर करून आपले करविषयक धोरण ठरविता येते

4.कामगार संघटनांचा उपयोग:

कामगारांचे वेतन विषयक करार करताना वेतन वाढवून घेण्यासाठी लवचिकतेचे उपयोग कामगार संघटनांना होत असतो एखाद्या उत्पादनाची

HRM Micro Economics Spe.1

मागणीची लवचिकता कमी असेल तर तेथे नफा जास्त मिळतो म्हणून कामगार संघटना येथे आपल्या सदस्यांचे वेतन वाढवून घेण्यात यशस्वी ठरतात.

5. **सरकारला किंमत व उत्पन्न विषयक धोरण ठरविताना:**

सरकारला किंमत विषयक धोरण ठरविताना मागणीच्या लवचिकतेचे चा विचार करावाच लागतो अलवचिक मागणी असणाऱ्या वस्तूंच्या किमती वाढण्याचा धोका असतो. त्यामुळे सरकार त्याचा पुरवठा वाढून केव्हा वितरण व्यवस्थेत सुधारणा घडवून आणून किंमत नियंत्रित करु शकते उदाहरणार्थ पेट्रोल रॉकेल. किंमत लवचिकतेचा परिणाम उत्पन्नावर होतो एखाद्या वस्तूच्या मागणीची लवचिकता अलवचिक असल्याने त्या वस्तूचे उत्पादन वाढते त्यामुळे त्या वस्तूंच्या किमती कमी होऊ लागतात त्या उत्पादकाचे उत्पन्न विशिष्ट मर्यादापेक्षा कमी होऊ लागते म्हणून सरकारला त्याचे उत्पन्न स्थिर राहावे किमती प्रमाणापेक्षा खाली येऊ नयेत म्हणून भाव बांधून द्यावे लागतात ह्यावेळी लवचिकतेचा उपयोग होतो.

6. **आंतरराष्ट्रीय व्यापारात व्यापार अटी ठरविताना:**

व्यापारशर्ती/ व्यापार ठरविताना आंतरराष्ट्रीय व्यापारात आयात निर्यात वस्तूंची मागणीची लवचिकता विचारात घ्यावी लागते उदाहरणार्थ भारतात इराणला चहाची निर्यात होते व त्याच्या मोबदल्यात इराणकडून पेट्रोलची भारतात आयात होते हिरा नुसता प्रदेशातल्या ने त्याची चहाची मागणी जास्त लवचिक आहे व भारताची पेट्रोलची मागणी कमी लवचिक आहे म्हणून भारताच्या दृष्टीने व्यापार शर्ती प्रतिकूल राहतील व इराणला अनुकूल राहतील म्हणजेच मागणीच्या लवचिकतेचे वर व्यापार अटी किंवा शर्ती ठरविल्या जातात.

HRM Micro Economics Spe.1

7. सार्वजनिक उपयोगितेच्या वस्तू उत्पादनाचा निर्णय घेताना:

सरकारच्या सार्वजनिक उपयोग ते त्याच्या वस्तू स्वतः निर्माण कराव्या लागतात कारण त्याची जनतेकडून असणारी मागणी लवचिक असते उदाहरणार्थ वीज-पाणी डाक सेवा या जर खाजगी क्षेत्राकडे दिल्या तर जास्त किमती आकारल्या जाण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे ग्राहकांचे शोषण होऊ शकते.

8.सरकारला आर्थिक धोरण ठरविताना:

वस्तू व. सेवांच्या किमती उत्पादन सरकारचे चलन व वित्तीय धोरण यामधील बदलाचे अर्थव्यवस्थेवर कोणते परिणाम होतील याचा अंदाज घेताना मागणीच्या लवचिकतेचे विचार सरकारला करावा लागतो.

9. आर्थिक स्थैर्य टीकविताना

किमतीतील मोठे चढ-उतार आर्थिक अस्थैर्य म्हणजेच तेजी-मंदी चक्र निर्माण करतात त्यावेळी किंमत नियंत्रणाचे धोरण ठरविताना सरकारला लवचिकतेचे उपयोग होतो. अशा प्रकारे प्रत्यक्ष व्यवहारात अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी व विविध आर्थिक उपायांच्या परिणामांचा अंदाज घेण्यासाठी मागणीची लवचिकता मार्गदर्शक ठरते.

मागणीच्या लवचिकतेची निर्धारक घटक

मागणीच्या लवचिकतेची निर्धारक घटक पुढीलप्रमाणे:

HRM Micro Economics Spe.1

1.वस्तूचे स्वरूप:

वस्तू कोणत्या प्रकारचे आहेत यावर किंमत लवचिकता ठरत असते जीवनावश्यक वस्तूंच्या बाबतीत मागणी अलवचिक असते कारण वस्तूंच्या किमतीत वाढ घट झाली तरी मागणीवर परिणाम होत नाही याउलट चैनीच्या वस्तूंची मागणी लवचिक असते कारण त्यांची थोडी जरी किंमत वाढली तरी मागणी मोठ्या प्रमाणावर बदल घडून येतो.

2. पर्यायी वस्तूंची उपलब्धता:

वस्तूला जेवढे जास्त पर्याय उपलब्ध असतील तेवढी मागणी लवचिक असते याउलट कमी पर्याय उपलब्ध असतील तर मागणी अलवचिक असते.

3. विविध उपयोगी वस्तू:

एकाच वस्तूचे अनेक उपयोगी असतील तर मागणी जास्त लवचिक असते उदाहरणार्थ वीज अनेक उपयोगासाठी वापरता येते परंतु विजेचे दर जास्त असतील तर महत्त्वाच्या उपयोगासाठी वापरली जाईल यावर स्वस्त दरातील तर अनेक उपयोगांसाठी वापरले जाईल म्हणून मागणी जास्त लवचिक असते.

4. स्वस्त वस्तू:

स्वस्त वस्तू व व्यक्तीच्या उत्पन्नाचा फारच कमी भाग खर्च केला जातो त्यामुळे अशा वस्तूंची मागणी कमी लवचिक असते उदाहरणार्थ आगपेटी मीठ.

5. टिकाऊ वस्तू:

HRM Micro Economics Spe.1

टिकाऊ वस्तूंची मागणी पुढे ढकलता येते किंवा वाढविता येते म्हणून अशा वस्तूंची लवचिकता अधिक असते अशा वस्तूंची किंमत वाढल्यास उपभोग पुढे ढकलता येतो याउलट किंमत कमी झाल्यास मागणी वाढविता येते उदाहरणार्थ रेफ्रिजरेटर कपाट.

6.सवयीच्या वस्तू:

सवय झालेल्या वस्तूंची मागणी अलवचिक असते कारण अशा वस्तूंचे कितीही किंमत वाढली तरी उपभोक्ता अपरिहार्यपणे खरेदी करत असतो उदाहरणार्थ धूम्रपानाची सवय जडलेल्या माणसाला सिगारेटी किती किंमत वाढली तरी खरेदी करावीच लागते.

7. **परस्परपूरक वस्तू:**

पूरक वस्तूंसाठी असणारी मागणी कमी लवचिक असते शाई व पेट्रोल अशा पूरक वस्तूसाठी असणारी मागणी कमी लवचिक आढळते कारण ही मागणी मुख्य वस्तू जसे पेन व मोटारसायकल यांच्या मागणी व गतीवर अवलंबून असते.

8. **प्रतिष्ठेच्या वस्तू:**

समाजात प्रतिष्ठा वाढविणारा सुवर्णालंकार दागदागिने अशा वस्तूंसाठी मागणी कमी लवचिक आढळते.

9. किंमतपातळी:

जास्त किंमत पातळी असणाऱ्या वस्तूंची मागणी जास्त लवचिक असते उदाहरणार्थ महाग मोटारगाड्या कमी किंमतीची पातळी असणाऱ्या वस्तूंची मागणी कमी लवचिक असते उदाहरणार्थ वर्तमानपत्र.

HRM Micro Economics Spe 1

10. उपभोक्त्याचे उत्पन्न पातळी:

सर्वात खालची व सर्वात वरची उत्पन्न पातळी असणाऱ्या अति गरीब व अति श्रीमंत लोकांची मागणी लवचिक असते कारण गरीब च्या वस्तू घेतात त्यांना पर्याय नसतो याउलट श्रीमंतांना किती जास्त किंमत देणे परवडते.

11. संपत्तीचे वितरण:

समाजात संपत्तीचे वाटप कशा प्रकारे झालेले आहेत यावरही लवचिकता अवलंबून असते प्रा यांच्यामते देशात जर संपत्तीचे असमान वाटप झालेले असेल तर तेथे मागणी कमी लवचिक आढळते याउलट संपत्तीचे समान वाटप झालेल्या देशात मागणी जास्त लवचिक आढळते.

12. **कालावधीचा परिणाम:**

मागणीच्या लवचिकतेवर कालावधीतही परिणाम होतो दीर्घकाळात वस्तूची मागणी अधिक लवचिक तर अत्यल्प काळात वस्तूची मागणी कमी लवचिक असते.

3.4.2 मागणीची उत्पन्न लवचीकता: अर्थ व प्रकार

मागणीच्या किंमत लवचिकतेचे किंमत व मागणे या दोन चलाचा विचार केला जातो तर उत्पन्न लवचिकतेत उत्पन्न व मागणी या दोन चलांतील विचार केला जातो व्यक्तीच्या उत्पन्नात बदल झाल्यास मागणी केली जाणारी नगर संख्या कितपत संवेदनशील राहते ते आपणास उत्पन्न होऊ शकते वरून करू शकते सामान्य वस्तूंबाबत उत्पन्न व मागणी या दोन चला मध्ये सम संबंध आहे.

HRM Micro Economics Spe.1

व्याख्या:

किमती व इतर घटक यात बदल झालेला नाही अशा स्थितीत शेकडा एकने उत्पन्न वाढल्यास मागणी परिमाणात होणारी शेकडा वाढ म्हणजे मागणीची उत्पन्न लवचिकता होय.

उत्पन्न लवचिकतेचे प्रकार

उत्पन्न लवचिकतेचे पुढील पाच प्रकार दिसून येतात

1. **ऋण उत्पन्न लवचिकता** उत्पन्नात वाढ होऊनही वस्तूच्या मागणी मोठ्या प्रमाणावर घट होत असेल तर तिला करुणा उत्पन्न लवचिकता असे म्हणतात उदाहरणार्थ निकृष्ट दर्जाचा किंवा गिफेन वस्तू बाबत उत्पन्ना लवचिकता ऋण आढळते.

2. **शून्य उत्पन्न लवचिकता:** उत्पन्नात किती वाढ किंवा घट झाली तरी मागणीत काहीही बदल होत असेल तर तिला शून्य उत्पन्ना लवचिकता असे म्हणतात उदाहरणार्थ मीठ,पोस्टकार्ड.

आकृती



आकृती क्र. 3.8 : उत्पन्न लवचीकतेचे प्रकार

3. एकक उत्पन्न लवचिकता: उत्पन्नात जेवढा बदल होतो नेमका तेवढाच बदल मागणी होत असेल तर उत्पन्ना लवचिकता एक असते.

4. एकापेक्षा जास्त उत्पन्न लवचिकता: उत्पन्नातील बदला च्या तुलनेत मागणी होणारा बदल जास्त असेल तर तिला एका पेक्षा जास्त उत्पन्न लवचिकता असे म्हणतात.

5. एका पेक्षा कमी उत्पन्न लवचिकता: उत्पन्नातील बदलाच्या तुलनेत मागणीत होणारा बदल कमी असेल तर मागणीची उत्पन्न लवचिकता कमी असते.

उत्पन्न लवचिकतेच्या संकल्पनेचे उपयोग

1.आर्थिक विकासात: राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत असताना नेमके कोणत्या वस्तूची किती मागणी वाढली हे समजण्यासाठी उत्पन्न लवचिकतेचा उपयोग होतो.

2.आर्थिक उच्चवचने: व्यापार चक्राच्या कालावधीतील मागणीतील बदल समजण्यासाठी या संकल्पनेचा उपयोग होतो.

3. आर्थिक नियोजनात: नियोजित अर्थव्यवस्थेत नियोजनकरांना उत्पादनाचे इष्टांक ठरविताना उपयोग होतो.

4. मागणीचा पूर्वअंदाज: उत्पादकांना मागणी पूर्व अंदाजामध्ये संकल्पनेचा उपयोग होतो.

5. विदेशी व्यापारात: देशाला आयात निर्यातीत उत्पन्न लवचिकतेचा उपयोग होतो.

HRM Micro Economics Spe.1

3.4.3 मागणीची छेदक लवचीकता अर्थ व प्रकार

मागणीची छेदक लवचीकता: अर्थ

मागणीच्या शोधक लवचिकतेला अन्योय लवचिकता असेही म्हणतात. काही वस्तू एकमेकांना पूरक असतात तर काही एकमेकांना पर्याय असतात त्यामुळे

अशा वस्तू पैकी एका वस्तूच्या किंमतीत बदल झाला की त्याचा परिणाम दुसऱ्या वस्तूच्या मागणीवर होतो म्हणजेच एका वस्तूंच्या किमतीतील बदलाला दुसऱ्याच्या वस्तूच्या मानेतील बदलाचा जो प्रतिसाद मिळतो त्याला मागणीची छेदक लवचिकता असे म्हणतात.

मागणीच्या छेदक लवचिकतेचे प्रकार

1. **अनंत लवचिकता:**

एका वस्तूची थोडी जरी किंमत वाढली तरी दुसऱ्या वस्तूचा खप शून्यावर येईल किंवा एका वस्तूची किंमत थोडी जरी घटले तरी दुसऱ्या वस्तूची मागणी अनंतापर्यंत वाढेल अनंत लवचिकता असते तेव्हा त्या वस्तू पूर्ण पर्याय असतात व्यवहारात अशी उदाहरणे बघावयास मिळत नाहीत.

2. **शुन्य लवचिकता:**

एका वस्तूची किंमत कितीही कमी किंवा जास्त झाली तर दुसऱ्या वस्तूच्या मागणी वर काहीही परिणाम होत असेल तर छेदक लवचिकता 0 येईल.

3. **धन लवचिकता:**

वरील प्रकारावरून असे लक्षात येते की दोन पर्यायी वस्तूंमधील मागणीची छेदक लवचीकता 0 व अनंत या दरम्यान असेल व ती धन असेल.

4. **ऋण लवचिकता:**

दोन परस्पर पूरक वस्तूच्या बाबतीत छेदक लवचिकत ऋण आढळते येथे एका वस्तूची किंमत वाढल्यामुळे दुसऱ्या वस्तूची मागणी घटते उदाहरणार्थ बॉल पेन ची किंमत वाढल्यास रिफील ची मागणी कमी होईल रुण लवचिकता दोन वस्तूंमधील परस्पर पूरकता दर्शविते.

आकृत्या

HRM Micro Economics Spe.1



आकृती क्र. 3.9 : छेदक लवचीकतेचे प्रकार

वस्तू मधील संबंध पुरकतेचा आहे की पर्यायतेचा हे ओळखण्यासाठी उत्पादकाला किंमत धोरण ठरविताना सरकारला कर बसविताना तसेच बाजाराचा प्रकार ओळखण्यासाठी म्हणजेच पूर्ण स्पर्धेचा की मक्तेदारीचा बाजार आहे यासाठी छेदक लवचिकतेचा उपयोग होतो.

HRM Micro Economics Spe.1

संदर्भसूची

1. सूक्ष्म अर्थशास्त्र(अर्थशास्त्र स्पेशल पेपर 1)डॉ. डी.जी उशीर, डॉ.एस. आर. जावळे ,डॉ. एच.डी आव्हाड ,डॉ. डी .बी. पवार ,निराली प्रकाशन, (सेमिस्टर 3) प्रथमावृत्ती ,जुलै 2020.
2. व्यवसायिक अर्थशास्त्र (सूक्ष्म) अथर्व प्रकाशन,डॉ.आर.जी.आघाव,डॉ.टि.जी.गिते,प्रा.आर.डी.जाधवर.2013.
3. व्यवसायिक अर्थशास्त्र (सूक्ष्म)निराली प्रकाशन,डॉ.डी.जी.उशीर,डॉ.आर.के.दातीर,एस.आर.जावळे,श्रीमतीबी.डी.पाटील,डॉ.जी.आर.पिंपळे, प्रथमावृत्ती, जुलै 2019.